**ठळक बातम्या**

- संसदेच्या कामकाजात वारंवार व्यत्यय येत असल्याबद्दल दोन्ही सभागृहांच्या प्रमुखांनी व्यक्त केली चिंता

- ऑपरेशन सिंदूर आणि ऑपरेशन महादेवच्या सफलतेबद्दल राष्ट्रीय लोकशाही आघाडी संसदीय पक्षाच्या बैठकीत प्रधानमंत्री मोदी यांचं अभिनंदन

- UPI व्यवहारांनी प्रथमच ७० कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला

- 'परीक्षा पे चर्चा' या उपक्रमाला गिनेसच्या जागतिक विक्रमांच्या यादीत स्थान

**आणि**

- अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिका बरोबरीत सुटल्यामुळे भारत जागतिक कसोटी विजेतेपदाच्या गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर

**<><><><>**

बिहार मधल्या मतदारयाद्यांच्या पुनरीक्षण मुद्द्यावरून विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केलेल्या गदारोळानंतर संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

लोकसभेचं कामकाज सुरु होताच काँग्रेस, द्रमुक, तृणमूल काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी हौद्यात उतरून घोषणाबाजी सुरु केली. सभापती ओम बिर्ला यांनी या गदारोळात प्रश्नोत्तरांचा तास सुरु करण्याचा प्रयत्न केला. विरोधकांनी सभागृहात चर्चा होऊ न देणे ही संसदेच्या प्रतिष्ठेला मारक बाब आहे, असंही ते म्हणाले. मात्र गदारोळ सुरूच राहिल्यानं कामकाज स्थगित करण्यात आलं. तत्पूर्वी सदनात दिवंगत माजी संसद सदस्य तिलकधारी प्रसाद सिंह, रामरति बिंद आणि शिबू सोरेन यांना आदरांजली वाहण्यात आली.

राज्यसभेतही याच मुद्द्यावरून विरोधकांनी गदारोळ केला. उपाध्यक्ष हरिवंश यांनी सदनाच्या कामकाजात सतत अडथळे येत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली. विरोधकांच्या गदारोळामुळे या अधिवेशन सत्रात आतापर्यंत ४१ तास  ११ मिनिटांचा वेळ वाया गेला, असं हरिवंश यांनी सांगितलं.

शेतकऱ्याचं उत्पन्न वाढवण्यासाठी सरकारनं गेल्या ११ वर्षात अनेक उपाय योजना केल्या आहेत, असं केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी आज लोकसभेत सांगितलं. चौहान एका पुरवणी प्रश्नाला उत्तर देत होते. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजने अंतर्गत सुमारे ४ लाख कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात थेट जमा करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

रालोआ म्हणजे राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाची बैठक आज नवी दिल्लीत झाली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांच्यासह रालोआचे इतर खासदार यावेळी उपस्थित होते.

ऑपरेशन सिंदूर आणि ऑपरेशन महादेव यशस्वीपणे राबवल्याबद्दल प्रधानमंत्री मोदी यांचं या बैठकीत अभिनंदन केलं. ही मोहीम यशस्वीरीत्या पार पाडण्यात सशस्त्र दलांचा मोठा वाटा आहे, त्यामुळे त्यांच्या वचनबद्धतेचं कौतुक करणारा ठराव सर्व खासदारांनी मंजूर केला. तसंच पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांना यावेळी आदरांजली वाहण्यात आली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दृढ निश्चय आणि दूरदर्शी नेतृत्वामुळे देशवासियांच्या मनात एकता आणि अभिमानाची भावना जागृत झाल्याचं सर्व खासदारांनी एकमुखानं म्हटलं.

**<><><><>**

फिलीपीनचे राष्ट्राध्यक्ष फर्डिनांड आर मार्कोस ज्युनिअर यांचं आज राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी औपचारिक स्वागत केलं. यावेळी पाहुण्यांना पारंपरिक मानवंदना देण्यात आली. मार्कोस यांनी सपत्नीक राजघाटावर जाऊन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या समाधीस्थळावर पुष्पार्पण करुन त्यांना आदरांजली वाहिली.

प्रधानमंत्री मोदी आणि फिलीपीनचे राष्ट्राध्यक्ष यांच्यात आज नवी दिल्लीत प्रतिनिधीमंडळ स्तरीय बैठक होणार आहे. या चर्चेमुळे द्विपक्षीय संबंध आणखी दृढ होतील, असा विश्वास परराष्ट्र व्यवहार मंत्री एस.  जयशंकर यांनी व्यक्त केला.

मोदी आणि मार्कोस यांच्या उपस्थितीत आज अनेक संयुक्त सहकार्य करारा होत आहेत. व्यापार आणि गुंतवणूक, संरक्षण, सागरी सहकार्य, कृषी, औषधनिर्माण अशा विविध मुद्यांचा आढावा आजच्या चर्चेत घेण्यात आला.

<><><>

युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस अर्थात UPI वरून केल्या जाणाऱ्या दैनंदिन व्यवहारांनी पहिल्यांदाच ७० कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया -NPCI नं प्रसिद्ध केलेल्या ताज्या अहवालानुसार, २ ऑगस्ट रोजी UPI व्यवहारांची संख्या सुमारे ७० कोटी ७० लाख रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

गेल्या दोन वर्षांत UPI व्यवहारांची दैनंदिन संख्या दुपटीनं वाढली असली, तरी एकूण व्यवहारांच्या रकमेच्या वाढीचा वेग गेल्यावर्षांच्या तुलनेत मंदावला आहे. केंद्र सरकारनं UPI च्या माध्यमातून दररोज १०० कोटी व्यवहारांचं लक्ष्य ठेवलं असून ते पुढील वर्षी पूर्ण होण्याची शक्यता आहे.

गेल्या महिन्यात UPI प्रणालीनं सुमारे एक हजार ९५० कोटी व्यवहार नोंदवले असून त्यांची एकूण किंमत २५ लाख कोटी रुपयांहून अधिक होती. सध्या भारतात ८५ टक्के व्यवहार हे UPI च्या माध्यमातून होतात. तर जगभरातील एकूण रिअल टाईम डिजीटल व्यवहारांपैकी सुमारे ५० टक्के व्यवहार हे UPI द्वारे केले जातात.

<><><>

दरवर्षीप्रमाणेच यंदाही येत्या स्वातंत्र्य दिनानिमित्त हर घर तिरंगा मोहीम राबवण्यात येणार आहे. सर्वांनी तिरंगा ध्वज फडकवावा, त्यासोबतचा आपला सेल्फी हरघरतिरंगाडॉटकॉम या संकेतस्थळावर अपलोड करावा, असं आवाहन सरकारनं केलं आहे. या मोहिमेसाठी कार्यकर्ता म्हणून नोंदणी गेल्या शनिवारपासून सुरु झाली असल्याचं सरकारी पत्रकात म्हटलं आहे.

<><><>

प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारानं सुरू झालेल्या 'परीक्षा पे चर्चा' या उपक्रमाला गिनेसच्या जागतिक विक्रमांच्या यादीत स्थान मिळालं आहे. 'नागरिकांचा सहभाग असलेल्या ऑनलाइन प्रणालीवर एका महिन्यात सर्वाधिक नोंदणीचा'  जागतिक विक्रम परीक्षा पे चर्चानं केला आहे. माय गव्ह या प्रणालीवर परीक्षा पे चर्चाच्या आठव्या

भागासाठी तीन कोटी ५३ लाख नागरिकांनी नोंदणी केली होती. त्याची दखल घेऊन गिनेसनं जागतिक विक्रमांच्या यादीत नोंद केली आहे. या जागतिक विक्रमाबाबतचं अधिकृत प्रमाणपत्र नवी दिल्लीत काल प्रदान करण्यात आलं.

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, रेल्वे आणि माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव या कार्यक्रमाला उपस्थित होते. परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात प्रधानमंत्री मोदी परीक्षेच्या ताणतणावाचं व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीनं थेट विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांशी संवाद साधतात.

**<><><><>**

नागपूरमध्ये एका मद्यधुंद सैनिकानं आपल्या वाहनाखाली नागरिकांना चिरडल्याची प्रसार माध्यमावर फिरत असलेली बातमी खोटी असल्याचं भारतीय लष्करानं स्पष्ट केलं आहे. जिल्ह्यातल्या नागरधन इथं रविवारी घडलेल्या घटनेचं वृत्तसंस्थांनी चुकीचं वार्तांकन केलं, असंही लष्करानं  स्थानिक पोलिसांकडून घटनेची खरी माहिती घेऊन स्पष्ट केलं आहे. सध्या सुट्टीवर असलेला लष्करातला जवान रविवारी घरी परतत असताना पार्किंगवरून त्याचा स्थानिकांशी वाद झाला. नंतर त्याची चारचाकी झाडाला धडकून अपघात झाला होता. मात्र, या अपघातात कोणत्याही नागरिकाला इजा झाली नव्हती. या हवालदाराने त्याचा पाठलाग करणाऱ्या स्थानिकांविरोधात पोलिसात तक्रार दाखल केल्याचं लष्करानं म्हटलं आहे.

**<><><><>**

खासदार आणि आमदारांविरुद्धचे फौजदारी खटले वेगाने निकाली काढण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. असे खटले हाताळणाऱ्या रजिस्ट्री आणि सर्व कनिष्ठ न्यायालयांनी राज्य सरकारने स्थापन केलेल्या समितीने सुचवलेल्या उपाययोजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, तसंच या संदर्भात केलेल्या कारवाईचा अहवाल पुढच्या सुनावणीला सादर करावा, असे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. सदर समितीने १७ जून, २४ जून आणि ७ जुलै रोजी झालेल्या बैठकींमध्ये या मुद्द्यावर चर्चा करून लोकप्रतिनिधींशी संबंधित प्रलंबित प्रकरणं जलदगतीनं पूर्ण करण्यासाठी अनेक शिफारसी केल्या आहेत.

**<><><><>**

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेत इंग्लंडबरोबर साधलेल्या गुणांच्या बरोबरीमुळे भारतीय संघ जागतिक कसोटी अजिंक्यपदाच्या गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. ओव्हल इथे झालेल्या या कसोटी सामन्यापूर्वी इंग्लंड गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर होता. काल झालेल्या या मालिकेतल्या शेवटच्या सामन्यात भारतानं इंग्लंडवर विजय मिळवत २-२ अशी बरोबरी साधली. ५ गडी बाद करणारा मोहम्मद सिराज हा सामनावीर ठरला. शुभमन गिल आणि हॅरी ब्रुक हे दोघं मालिकावीर ठरले. या विजयामुळे भारताच्या खात्यात १२ गुणांची भर पडली असून भारतीय संघ आता तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. ऑस्ट्रेलियाचा संघ या गुणतालिकेत आघाडीवर आहे.

<><><><>

प्रसिद्ध टेनिसपटू नोवाक जोकोविच याने सिनसिनाटी टेनिस स्पर्धेतून माघार घेतली आहे. गेल्या महिन्यात झालेल्या विम्बल्डन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत वैद्यकीय कारणांमुळे माघार घेतल्यानंतर जोकोविच प्रथमच हार्ड कोर्ट प्रकाराच्या या स्पर्धेत सहभागी होणार होता. मात्र आता तो थेट येत्या २४ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत खेळणार आहे.

//<><><><>//